# मोठे मन कोणाचे?

प्रल्हाद अवचट

राज्य साधन केंद्र, पुणे
जे. पी. नाईक पथ, १२८/२ कोथरूड, पुणे ४११ ०२९

srcpune.nic.in

# मोठे मन कोणाचे?

श्रेणी : I

प्रथम आवृत्ती : जानेवारी २००३

srcpune.nic.in

संपादक : डॉ. द. खं. पोखरापूरकर

प्रकाशक : राज्य साधन केंद्र, पुणे

© राज्य साधन केंद्र, पुणे

१२८/२, जे. पी. नाईक पथ,
कोथरूड, पुणे ४११ ०२९

आतील चित्रे व मुखपृष्ठ : प्रभाकर काटे

srcpune.nic.in

सजावट व मांडणी : श्रीधर पाटील, नंदन खळे

मुद्रक : प्रिंट इंप्रेशन्स, हडपसर, पुणे ४११ ०१३

किंमत : रु. ९.००

# प्रस्तावना

गोष्टीद्वारे ज्ञान व मनोरंजन साधता येते. कथा वाचून त्यापासून बोध घेता येतो. नवसाक्षरांना मानवी आयुष्यातले अनुभवच शिकवित असतात. या अनुभवातूनच बोध देणाऱ्या नीतिबोध कथा सर्वांना आवडतील. 'मोठे मन कोणाचे?' आणि 'खरा अधिकारी कोण?' या कथा वाचून मनाचा कोतेपणा आणि अधिकाराचा वापर याविषयी माहिती मिळेल.

**डॉ. द. खं. पोखरापूरकर**
**संचालक**
राज्य साधन केंद्र, पुणे

srcpune.nic.in
srcpune.nic.in
srcpune.nic.in

# मोठे मन कोणाचे?



srcpune.nic.in

एक सावकार होता. एकदा तो गावाला निघाला. रात्री एका शहरात थांबला. दुसऱ्या दिवशी त्याला काही माणसे भेटायला येणार होती.

srcpune.nic.in

प्रवासात सावकाराचे जोडे फाटले. अनवाणी पायाने तो आपल्या खोलीत आला.

त्याने मुनिमाला बोलावून घेतले. उद्या सकाळी जोडे खरेदी करायचे असे ठरविले. इकडे-तिकडे वावरताना तो अस्वस्थ होता.

srcpune.nic.in

दुसऱ्या दिवशी सकाळी मुनीमासह गाडीतून निघाला. वाटेत अनेक लोक भेटले. त्याला वाटले, 'लोक आपल्या अनवाणी पायाकडेच पाहात आहेत.'

सावकार मुनीमासह एका दुकानात गेला. विशेष विचार न करता सावकाराने खरेदी उरकली. एकदाचे पायात जोडे घातले.

srcpune.nic.in

सावकार गाडीत जाऊन बसत होता. तेवढ्यात त्याच्यासमोर एक हात पुढे आला.



srcpune.nic.in

एकजण भीक मागत होता. सावकाराने नाणी काढली. त्याच्या हातावर ठेवली.

सहजच त्याने तो कोण आहे हे पाहिले. तो एक भिकारीच होता. हातात नाणी घेत तो दुवा देत होता. तो अगदी आनंदी होता.

त्याच्याकडे निरखून पाहताना सावकाराला धक्का बसला. कारण त्या भिकाऱ्याला दोन्ही पायच नव्हते. गुडघ्यावरच तो खरडत चालत होता.

सावकार गाडीतून निघाला. पण त्याला स्वतःचा तिटकारा वाटू लागला.

‘‘अरे! माझे साधे जोडे फाटले होते. पण मी बेचैन होतो. याला पायच नाहीत तरी हा आनंदी आहे.’’.

आपल्या मनाचा कोतेपणा त्याला कळून आला.

❖❖❖

srcpune.nic.in srcpune.nic.in srcpune.nic.in

# खरा अधिकारी कोण?



srcpune.nic.in

एक राजा होता. त्याचा एक प्रधान होता. एकदा सकाळीच राजा प्रधानाच्या घरी गेला. प्रधानजी देवपूजा करीत होते.

प्रधानाची बायको म्हणाली, ''आपण जरा बसावे, प्रधानजी जप करीत आहेत.'' थोड्या वेळाने प्रधानजी बाहेर आले. राजाला वंदन करून म्हणाले, ''बोला महाराज! काय काम काढलेत?''

srcpune.nic.in

राजाने विचारले, ''प्रधानजी! आपण कोणता जप करीत होता?''

srcpune.nic.in

प्रधानजी म्हणाले, ''जपाचे राहू द्या. आधी काम सांगा.'' राजाने आपले काम सांगितले. 'ते करूनच दरबारात या' असे बजावले. काम करून प्रधानजी दरबारात गेले. राजाला परत जपाची आठवण झाली.

srcpune.nic.in

तो म्हणाला, ''प्रधानजी! तुमचा जप कोणता होता? मीही तो करीन म्हणतो.''



प्रधानजी म्हणाले, ‘‘महाराज! मी गुरूकडून तो जप घेतला आहे. मला तुम्हाला सांगता येणार नाही.’’

राजा म्हणाला, ‘‘तुम्ही माझे गुरू व्हा.’’

प्रधानजी म्हणाले, ‘‘नाही महाराज! तो माझा अधिकार नाही. अधिकाराविना कुणी कुणाला काही सांगू नये.’’

राजाला राग आला. इकडे प्रधानजीने शिपायांना सांगितले ‘‘राजाचे डोके फिरले

आहे. त्याला घेवून जा.'' शिपायांनी ऐकले नाही. तेवढ्यात राजा म्हणाला, ''या प्रधानाला अटक करा.

srcpune.nic.in



srcpune.nic.in

शिपायांनी राजाला मुजरा केला. प्रधानाला बेड्या घातल्या. संध्याकाळी राजा कोठडीतल्या प्रधानाला भेटायला गेला. प्रधान म्हणाला, ''महाराज! आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळाले ना?''

srcpune.nic.in

राजा म्हणाला, ''कोणता प्रश्न?''



प्रधान बोलला, ‘‘आपणास माझ्याकडून जप हवा होता. तो माझा अधिकार नाही असे मी म्हटले. ते पटले ना?’’ राजा गोंधळला.

प्रधानजी म्हणाले, ‘‘शिपायांनी माझे ऐकले नाही. परंतु तुमची आज्ञा पाळली.

कारण तुमचा तो अधिकार होता. तसेच मलाही मंत्र देण्याचा अधिकार नाही.’’

❖❖❖



srcpune.nic.in